महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / फ्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ५८ वा | शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# न्यायालयात मराठा समाजाचा विजय !

## आरक्षणाच्या GR विरोधातील याचिका न्यायाधीशांनी फेटाळली

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठ्यांना हैदराबाद गॅझेटियरनुसार आरक्षण देण्याबाबतच्या सरकारच्या जीआरला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. याबाबतच्या निर्णयाविरोधात हायकोर्टात जीआरला विरोध करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

वकील विनित धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर हायकोर्टात दोन सत्रात सुनावणी पार पडली. हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. यानंतर हायकोर्टाने विनित धोत्रे यांची याचिका ग्राह्य धरण्याजोगी नाही, असं म्हणत याचिका फेटाळली. त्यामुळे मराठा समाजासाठी हा सर्वात मोठा दिलासा मानला जात आहे.

**हायकोर्टाने नेमकं काय म्हटलं?**

"याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेमधील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल तर त्यांनी स्वतःची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी", असं म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली. पण यावेळी मुंबई हायकोर्टाने एक महत्त्वाची मुभादेखील दिली आहे. याचिकाकर्त्यांनी वरच्या न्यायालयात जावं किंवा जीआरविरोधात इतर रिट याचिका ज्या दाखल करण्यात आल्या आहेत त्या इंटरलिंक करण्याची मुभा कोर्टाने दिली आहे.

सरकारकडून महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी मुंबई हायकोर्टात युक्तिवाद केला. शासन निर्णयाने शेड्यूल कास्टमधील कुणीही बाधित नाही, अशी माहिती महाधिवक्तांनी कोर्टात दिली. त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच जनहित याचिका ग्राह्य धरण्यास पात्र नाही, असं हायकोर्टाने स्पष्ट केलं. तसेच जनहित याचिकेच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीला आव्हान दिलं जाऊ शकत नाही, असंही हायकोर्ट म्हणालं.

**■ नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?**

हैदराबाद गॅझेटच्या जीआरविरोधातील याचिका फेटाळल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. आमचा न्याय देवतेवर विश्वास आहे, गोरगरिबांच्या बाजूने न्यायदेवता उभी राहाते, सरकारनंतर न्यायदेवता हीच गोरगरिबांचा आधार आहे. सरकारला त्यांची बाजू भक्कमपणे मांडावीच लागणार आहे, असं यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर देखील पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी भुजबळांचा उल्लेख अलिबाबा असा केला आहे. येवल्याचा अलिबाबा दोन आरक्षण खात आहे, त्यांना लवकरच बेसन -भाकरी खावी लागेल असा खोचक टोला यावेळी जरांगे पाटील यांनी भुजबळ यांना लगावला आहे. मी गोरगरिबांसाठी सर्व काही करत आहे. समाजाला माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. काही अभ्यासकांनी समाजाला अजून काहीच दिलं नाही, मी माझं काम करत आहे, त्यामुळे समाजाने जे गैरसमज पसरवतात त्यांच्याकडे लक्ष देऊ नये, असं देखील यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.



**इतर याचिकांचं काय होणार?**

मराठा आरक्षणाचा नवा जीआर लागू झाल्यानंतर ओबीसी समाजातील नेते मंडळी आणि अभ्यासकांमध्ये नाराजीचा सूर बघायला मिळाला. अनेक ओबीसी नेते नाराज झाले. त्यांनी हायकोर्टात जाण्याची तयारी केली. अनेकांनी हैदराबाद गॅझेटियरच्या नव्या जीआरला कोर्टात आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी पहिली याचिका वकील विनित धोत्रे यांनी दाखल केली होती. यानंतर अनेकांनी याचिका दाखल केल्या आहेत. हायकोर्टाने पहिल्या जनहित याचिकेवर आज सुनावणी घेत ती याचिका फेटाळून लावली आहे. पण मराठा आरक्षणाच्या नव्या जीआरला विरोध करणाऱ्या इतर याचिंकांबाबत हायकोर्ट काय निर्णय घेणार? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## मतदान चोरी संघटित कटाचा भाग, काँग्रेस समर्थक मतदार लक्ष्य- गांधी

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा मतचोरीचा मुद्दा उपस्थित केला आहे आणि निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला आहे. त्यांनी आरोप केला आहे की, कर्नाटकातील अलांड विधानसभा मतदारसंघातून ६,०१८ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. ते म्हणाले की, हे एका संघटित कटाचा भाग आहे आणि केवळ काँग्रेस समर्थक मतदारांना लक्ष्य केले जात आहे.

राहुल गांधी यांनी काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषदेत सांगितले की, मतदार यादीतून नावे वगळण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात आणि केंद्रीकृत केली जात आहे. अलांड विधानसभा मतदारसंघात काँग्रेस समर्थक मतदारांना लक्ष्य केले गेले आणि त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. त्यांनी दावा केला की आतापर्यंत मतदार यादीतून वगळण्याच्या ६,०१८ घटना नोंदवल्या गेल्या आहेत. ही संख्या आणखी वाढू शकते.




ते म्हणाले की, ह्लमतचोरीचेह्व हे प्रकरण चुकून उघड झाले जेव्हा बूथ-लेव्हल ऑफिसर (बीएलओ)च्या नातेवाईकाचे नाव यादीतून गहाळ असल्याचे आढळले. चौकशीत असे दिसून आले की, ही प्रक्रिया एका तृतीय पक्षाद्वारे केली जात होती आणि ती स्वयंचलित सॉफ्टवेअर वापरून चालवली जात होती. त्यांनी सांगितले की, या प्रक्रियेदरम्यान ज्या व्यक्तीचे नाव यादीतून काढून टाकण्यात आले होते त्याचे नाव त्यांच्या शेजाऱ्याचे असल्याचे उघड झाले.

राहुल गांधी म्हणाले की, जेव्हा बीएलओने शेजाऱ्याला विचारले तेव्हा त्यांनी वगळण्यास नकार दिला. त्यानंतरच्या तपासात असे दिसून आले की, ही काढण्याची प्रक्रिया ऑनलाइन स्वयंचलित प्रक्रियेद्वारे करण्यात आली होती आणि वापरलेले मोबाइल नंबर कर्नाटकाबाहेर होते. मतदार यादीतून काढून टाकण्यात आलेल्या नावांबाबत गंभीर प्रश्न उद्भवतातः ते नंबर कोणाचे आहेत, ते कुठे चालवले जातात आणि त्यांचे आयपी पत्ते काय आहेत. शिवाय, काढण्याच्या प्रक्रियेदरम्यान ओटीपी कोणाला मिळाला आणि त्या नंबरवर कॉल केल्यावर कोणीही का उत्तर दिले नाही. (पान 2 वर..)

विकणे /भाड्याने देणे आहे

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## मोहोळ तालुक्याला चार नद्यांच्या पुराचा वेढा'; भीमा, भोगावती, नागझरीलाही पूर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे भीमा, सीना, भोगावती व नागझरी या नद्या तुडुंब भरून वाहत आहे. रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे मोहोळ तालुक्याला या चार नद्यांच्या महापुराचा अक्षरशः वेढा घातला आहे.



उजनी व वीर धरणातून भीमा नदीत विसर्ग सुरू आहे. तर परंडा तालुक्यातील सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत विसर्ग सोडण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील बालाघाटच्या डोंगर रांगेत मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. बार्शी तालुक्यातील सर्व प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. त्यामुळे भोगावती व नागझरी नदीला पूर आला आहे. भीमा नदी मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागातून वाहते. सीना, भोगावती व नागझरी या नद्या मोहोळ तालुक्याच्या उत्तर भागातून वाहत आहेत. मोहोळ तालुक्यातून वाहणाऱ्या चारही नद्यांच्या पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात नदीपात्र बाहेर पडले आहे. तसेच सतत पडणाऱ्या पावसामुळे मोहोळ तालुक्यातील शिवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्यामुळे खरीप हंगामातील व बागायती पिके जागच्या जागी नासू लागली आहेत.

मोहोळ तालुक्यातील एकुरके ते मलिपेठदरम्यान सीना नदीच्या पाण्याने बामण पट्टा, हजारे वस्ती व सौदागर मोरे यांच्या शेतातून वाट काढत प्रवाह बदलला आहे. त्यामुळे शेतातील पिके व मातीही मोठ्या प्रमाणात वाहून गेली आहे. पावसाचे प्रमाण जास्त झाल्यामुळे पिके पिवळी पडून जागीच जळून जात आहेत.

**जाधव वस्तीचा सहा दिवसांपासून संपर्क तुटला**

वाळूज गावाकडील भोगावती नदीला व मुंगशीकडील नागझरी नदीला व साखरेवाडी (ता. उत्तर सोलापूर) कडील काटओड्याला पूर आल्यामुळे वाळूज (ता. मोहोळ) येथील दीडशे कुटुंब व पाचशे लोकसंख्या असलेल्या जाधव वस्तीचा सहा दिवसांपासून संपर्क तुटल्याची माहिती जाधव वस्तीतील शंकर मोटे यांनी सकाळला सांगितली. नद्यांना व ओढ्याला दिवसेंदिवस पाणी वाढतच आहे. त्यामुळे पाणी कधी कमी होईल सांगता येत नाही. प्रशासनाने लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## अतिवृष्टी झालेल्या ठिकाणचे पंचनामे करून अहवाल सादर करावा - पालकमंत्री गोरे



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सातत्याने पाऊस पडत असून, 91 महसुली मंडळापैकी 43 महसुली मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. तसेच उजनी व सीना नदी मधून पाणी सोडल्याने अनेक गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे, घरांचे तसेच गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचेही नुकसान झालेले आहे. तरी प्रशासकीय यंत्रणांनी नुकसानीचे पंचनामे अत्यंत गतिमान पद्धतीने तसेच 65 मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडलेला ठिकाणचे 100 टक्के पंचनामे करून त्याचा सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश राज्याचे ग्राम विकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीबाबतच्या आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सुनील कुंभार, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सकृत खांडेकर, यांच्यासह प्रांताधिकारी व सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेती पिकांचे व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. प्रशासकीय यंत्रणेने त्वरित पंचनामे करावेत. एकही शेतकरी व नागरिक पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. ज्या ठिकाणी 65 मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस झालेला आहे, अशा ठिकाणचे सरसकट पंचनामे करावेत, यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड चालणार नाही. अशा ठिकाणचे पंचनामे राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रांताधिकारी यांची राहील, असेही त्यांनी निर्देशित केले.

तसेच पंचनामे करत असताना शेतकऱ्यांची पुन्हा ई केवायसी करण्याची आवश्यकता नाही, यापूर्वीच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेसाठी तसेच अन्य शासकीय योजनांसाठी शेतकऱ्यांचे ई- केवायसी झालेली आहे. त्याच बँक खात्यावर शेतकऱ्यांना थेट नुकसान भरपाईची रक्कम मिळेल यासाठी तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी दक्षता घ्यावी. ई -केवायसी अभावी पंचनामेचा अहवाल पाठवण्यास दिरंगाई करू नये, असे पालकमंत्री गोरे यांनी सुचित केले. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग यांनी त्यांच्या अधिनस्त रस्त्याच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत. यंत्रणांनी जे शक्य आहे ते लवकरात (पान 2 वर..)

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## सीना नदीला आलेल्या महापुरामुळे माढा तालुक्यातील बंधारे पाण्यात

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सीना नदीला आलेल्या महापुरामुळे माढा तालुक्यातील सीना नदीवरील सर्व बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तसेच माढा-वैराग अर्थात माढा-तुळजापूर ही वाहतूक ठप्प झाली आहे. परंडा तालुक्यातील सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत मोठ्या प्रमाणावर सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या सर्व गावांमध्ये पूर्वपरिस्थिती निर्माण झालेली आहे.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार अभिजित पाटील यांनी माढा तालुक्यातील पूरग्रस्तभागाची बुधवारी (ता. १७) पाहणी केली.

माढा तालुक्यातील सीना नदीवरील सर्व बंधारे पाण्याखाली गेले आहेत. बंधारे पाण्याखाली गेल्याने अनेक मार्ग बंद झाले आहेत. सीना नदीकाठी असलेल्या शेतात पुराचे पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची उडीद, ऊस, मका यासारख्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांकडून शासनाने तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे. मुंगशी, चोभेपिंपरी या भागातील शेतकऱ्यांच्या केळी व इतर बागा पाऊस व वाऱ्यामुळे जमीन दोस्त झाले. नदीकाठच्या शेतकऱ्यांबरोबरच नदीकाठी नसलेल्या शेतकऱ्यांचीही या पावसामुळे नुकसान झालेले आहे.



**शाळांना सुट्टी, बससेवा होती बंद**

सीना नदीकाठी पूरस्थिती असल्याने पुराचा धोका संभवणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेतून सुट्टी देण्यात आली. पुलावर पाणी असल्याने अनेक शिक्षकांना शाळेपर्यंत पोचता आले नाही. माढा - वैराग बससेवाही बंद राहिली.

"लोकांना मदत आवश्यक असल्यास संपर्क करण्याचे आव्हान सकाळीच समाज माध्यमावर केले होते. पूरपरिस्थिती ओसरल्यावर लगेच प्रशासनाने लगेच पंचनामे करावेत. या पूरस्थितीचे व्हिडिओ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दाखवणार असून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी करणार आहे.

**- प्रा. शिवाजीराव सावंत,** माजी सदस्य, जिल्हा परिषद, मानेगाव

"शासनाने नुकसान भरपाईसाठी ठरवून दिलेले निकष बाजूला ठेवत अपवादात्मक परिस्थिती म्हणून माढा विधानसभा मतदारसंघ, माढा तालुका व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. अतिवृष्टीच्या नुकसानीच्या निकषात सध्याची परिस्थिती बसत नसली तरी शासनाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा विचार करावा. भीमा नदीतील पाणी पाचवेळा शेतकऱ्यांच्या शेतातून वाहून गेलेले आहे. सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांचेही प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे ६० मिलिमीटर पाऊस, सलग पाच दिवस पाऊस यासारखे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी.

**- अभिजित पाटील,** आमदार, माढा विधानसभा मतदारसंघ

## संपादकीय

# बनावट औषधांचा धंदा!

एका अहवालात भारतीय बाजारपेठेतील दर चार औषधांपैकी एक औषध बनावट असल्याचा दावा केला आहे. अनेक आजारांवर बनावट औषधे बाजारात उपलब्ध आहेत. वेगवेगळ्या नावांनी, देशी आणि परकी कंपन्यांच्या नावाखाली बनावट औषधांचा बाजार थाटला गेला आहे. अलीकडेच आग्रा येथे बनावट औषधांचे मोठे सिंडिकेट उघडकीस आले. या प्रकरणाचा सखोल तपास केला असता पुद्दुचेरी आणि चेन्नईत बनावट औषधांची निर्मिती करताना त्याची साठवणूक मात्र आग्रा येथे केली जात असे. तेथून चार राज्यांत त्याचा पुरवठा व्हायचा. औषध विभागाच्या पथकाने केलेल्या छापेमारीत आठ कंपन्यांची सुमारे 71 कोटी रुपयांची औषधे जप्त करण्यात आली आणि याप्रकरणी तीन औषध विक्रेत्यांना अटक करण्यात आली. सिंडिकेटमध्ये 40 औषध विक्रेते सामील असल्याचे पुरावे सापडले आहेत. औषधांचा काळाबाजार करणाया पंधरा डमी कंपन्यांची ओळख पटली आहे. त्यांच्या नावावर अनेक राज्यांत बाजार केला जात होता. औषधाची मागणी आणि पुरवठा करण्यासाठी माङ्गियांकडून रेल्वेसेवेचा वापर केला जात होता. मागील वर्षी आग्रा येथे शास्त्रीपुरम येथे जनावरांची बनावट औषध तयार करणारा कारखाना पकडला होता.

बनावट औषधांचा व्यापार करणायांचे जाळे संपूर्ण देशभरात पसरलेले आहे. मनुष्यप्राणीच नाही तर प्राण्यांसाठी वापरली जाणारी औषधेही बनावट स्वरूपात बाजारात आणली जात आहेत. या काळाबाजारात वरपासून ते खालपर्यंतचे विविध स्तरांवर मिलीभगत दिसून येते. 1969 पासून कार्यरत असलेल्या, देशातील सर्वात मोठा औषधांचा ठोक व्यापार करणाया भागीरथी पॅलेसवर दिल्लीच्या औषधी नियंत्रण विभाग आणि पोलिसांनी गेल्या तीन वर्षात अनेकदा छापे घातले. तेथे 14 कोटी रुपयांपेक्षा अधिक बनावट औषधांचा साठा पकडण्यात आला आहे. यात बहुतांश बनावट औषधे कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड, मधुमेह आणि स्नायूच्या रोगांसंबंधीची होती आणि त्यांची औषधे नामांकित ब्रँडच्या नावाखाली विकली जात होती. विशेष म्हणजे बनावट औषधांचे पॅकेजिंग, बारकोड-क्युआर कोड हे मूळ औषधांसारखेच असल्याने खरेदीदारदेखील डोळे झाकून त्याची खरेदी करतात. परिणामी रुग्णांची तब्येत सुधारण्याची चिन्हे दिसत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगातील बनावट औषधांचा काळाबाजार 16 लाख 60 हजार कोटी रुपयांचा आहे. बनावट औषधांपैकी 67 टक्के औषधांमुळे लोकांचा जीव धोक्यात असल्याचे सांगितले जाते. उर्वरित औषधे धोकादायक नसली तरी त्यात बरेचदा आजारपण बरा करणारा घटक पदार्थ नसतो आणि त्यामुळे रुग्ण लवकर बरा होत नाही. शेवटी त्याची तब्येत ढासळत जाते आणि तो मृत्यूच्या दाढेत ओढला जातो. बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या औषधांच्या आयात आणि नियार्तीच्या आघाडीवर भारत चौथ्या क्रमाकांवर आहे. 'असोचेम'च्या एका अभ्यासानुसार, भारतात 25 टक्के औषधे ही बनावट किंवा निकृष्ट असतात. भारतीय बाजारातील त्यांची उलाढाल सुमारे 352 कोटी रुपयांची आहे.

2024 मध्ये तेलंगणात कोट्यवधींची बनावट औषधे किंवा निकृष्ट दर्जाच्या औषधांचा साठा पकडला होता. तेलंगण औषध नियंत्रण प्रशासनाच्या तपासात नामांकित कंपन्यांच्या नावाने विकल्या जार्णाया या औषधात खडूची पावडर किंवा स्टार्चचे मिश्रण केल्याचे निदर्शनास आले. याप्रमाणे कॅप्सूल ॲमोक्सिलिनची असेल तर त्यात स्वस्तातील औषध पॅरासिटीमॉल भरलेले आढळून आले. यानुसार औषधात 500 ग्रॅम ॲमोक्सिलीन साल्टचे प्रमाण आवश्यक असताना तेथे केवळ 50 ग्राम साल्ट होते. अशावेळी रुग्ण कसा बरा होणार. कर्करोगाचे देखील बनावट औषधे पकडण्यात येत आहेत. ही सर्व औषधी उत्तराखंडच्या काशीपूर आणि उत्तर प्रदेशातील गाझियाबादहून कुरियरमार्ङ्गत तेलंगणात पोचवली जात होती. या औषधाचे पॅकेजिंग खया औषधांप्रमाणे करण्यात आले आणि त्यामुळे औषधांचा ङ्गरक करणे कठीण जात होते.

उत्तराखंडच्या औषधी नियंत्रण विभागाच्या तपासात गेल्यावर्षी अनेक औषध कंपन्यांचे नमुने अपात्र ठरल्याने त्यांचे परवाने रद्द करण्यात आले होते. हे सर्व औषधे उत्तराखंडमध्ये तयार केले जात होते. याप्रमाणे उत्तर प्रदेशमधील आग्राच्या महंमदपूर येथे 2024 मध्ये बनावट औषध तयार करणारा कारखाना पकडला. पोलिसांनी तेथे 80 कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त केली. यात कर्करोग, मधुमेह, ॲलर्जी, स्लिपिंग पिल्स आणि अँटिबायोटिक्स औषधांचा समावेश होता. याप्रमाणे देशातील अनेक राज्यांत छापेमारी करत बनावट औषधांचा मोठा साठा पकडण्यात आला होता. यापूर्वी करोना काळात देशभरात बनावट रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा पुरवठा करण्याचे प्रकरणेही घडली आहेत.

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने अनेक मोहिमांतून गेल्या वर्षभरात दिल्ली-एनसीआरमध्ये अनेक सिंडिकेटचा भांडाङ्गोड केला आहे. गाझियाबादच्या लोनी येथील ट्रोनिका सिटी येथे बनावट औषधांचा साठा पकडला आणि त्याचा मास्टरमाइंड डॉक्टरच निघाला. सोनीपतच्या गन्नौर येथील कारखान्यात भारत, अमेरिका, ब्रिटन, बांगलादेश आणि श्रीलंकेतील सात मोठ्या कंपन्यांचे वीसपेक्षा अधिक ब्रँडची बनावट औषधी तयार केली जात होती. इंडिया मार्ट आणि भागीरथ प्लेसपर्यंत त्यांचा पुरवठा सुरळीत सुरू असायचा. भारताशिवाय चीन, बांगलादेश, नेपाळमध्ये देखील या बनावट औषधांची निर्यात केली जात असे.

काही औषधे गरजेपेक्षा अधिक प्रमाणात प्राशन केल्यास त्यातून धुंदी येऊ शकते. मद्य किंवा अमली पदार्थाच्या तुलनेत या औषधांचे सेवन स्वस्त असल्याने काही जण त्याचा वापर करतात. या कारणामुळे कङ्ग सिरप, पेन किलर्स, डिप्रेशन पिल्स आणि मनोरुग्णाला देण्यात येर्णाया इंजेक्शनची विक्री वाढत आहे. त्याचा लाभ काही कंपन्यांदेखील घेत आहेत. एकाच परवान्यावर अनेक कारखाने सुरू करत त्याची बिनधास्त निर्मिती केली जात आहे. डिप्रेशनच्या उपचारासाठी देण्यात येणारी गोळी आजकाल रेव्ह पार्टीत र्बयापैकी वापरली जाते.

आग्रा येथे औषधांच्या माफियांनी ब्रँडेड कंपन्यांच्या औषधांच्या सुरक्षा पडताळणीवरच डल्ला मारला. आर्टिङ्गिशियल इंटिलिजन्सच्या मदतीने बनावट क्युआर कोड तयार केले. एवढेच नाही तर कंपनीच्या एकाच बॅच नंबरने हजारपट औषधांची निर्मिती करून ती बाजारात आणली. पण या व्यवहारात एकच बिल सतत दाखविले जात असल्याने चोरी उघड झाली. नामांकित कंपनीला जेव्हा उत्पादनापेक्षा अधिक औषधे बाजारात दिसू लागली तेव्हा त्यांनी विभागाकडे तक्रार केली. तीन-चार महिने त्यावर पाळत ठेवली गेली आणि पुरावे हाती लागल्यानंतर छापेमारी करण्यात आली. खऱ्या औषधांच्या आड खोट्या औषधांचा बाजार वाढत आहे. प्रथमदर्शनी ही औषधी र्खया औषधांप्रमाणे भासतात. मात्र बनावट औषधांत वेगवेगळे घटक वापरून त्यावर र्खया कंपन्यांचे लेबल लावून लोकांच्या माथी मारली जातात.

# आत्महत्या करणे हे डरपोक व अविचारी माणसांचे लक्षण

आजकालचा माणूस अविचारी, असंयमी, अधीर व डरपोक वृत्तीचा बनला आहे. त्याची विचारसरणी व वैचारिक कुवत म्हणावी तेवढी प्रबळ व सक्षम झाली नाही. म्हणून तो त्याच्यावर आलेल्या संकटांना, त्याच्यावर आलेल्या अपयशांना, त्याच्यावर आलेल्या अडीअडचणींना आणि त्याच्या वाट्याला आलेल्या दुःखाला पचवण्याची क्षमता व विचारधारा डरपोक बनली आहे. म्हणजे हल्ली माणसांचे विचार पोकळ झाले आहेत. आजकालचा माणूस अगदी शुल्लक गोष्टीचा सुद्धा विचार करून मानसिक ताण घेत आहे. जसे की, परीक्षेत नापात्र होणे, स्पर्धा परीक्षेत एक दोन गुणांनी हुकणे, वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून, घरातील अठरा विश्व दारिद्र्याचा नायनाट होत नाही म्हणून किंवा वाट्याला कायम दुःख येत आहे म्हणून आजकालची माणसे स्वतःचे मन खंबीर व धीट बनवून आलेल्या अपयशाला व दुःखाला न घाबरता व न डगमगता मन व काळीज धाडसी बनवून आणि विचारधारा परिपक्व बनवून त्याच्यावर हिंमतीने मात करून पुढील वाटचाल केली पाहिजे. जीवनात येणारे दुःख हे काय, कायमस्वरूपी राहत नसते. कालांतराने दुःखाचा नायनाट होऊन सुख प्राप्त होत असते. दुःखानंतर सुखाची आणि सुखानंतर दुःखाची मंगलमय पहाट उगवतच असते, हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून जीवनात येणाऱ्या दुःखाचे मनःपूर्वक स्वागत करा आणि हुरळून न जाता सुखाला सलाम करा.. कारण जीवनात दुःख आहे म्हणून सुखाचे महत्त्व कळते. म्हणून माणसाने दुःखातून खूप काही शिकले पाहिजे. दुःखाचा हिंमतीने सामना करून जिगरबाज बनले पाहिजे. पण आजकाल तसे होताना दिसत नाही. आजकालच्या माणसांची विचारधारा घाबरट व बोथट बनली आहे. आत्ताच्या मुलांना जीवनात आलेले दुःख व यश पचवता येत नाही. जीवनात जरासे दुःख व अपयश आले म्हणून जरा धीर व हिंमत न धरता आत्ताची मुले निराश व दुःखी बनत आहेत. आणि भलतेच नको ते टोकाचे पाऊल उचलून नको ते अविचारी कृत्य करत आहेत. म्हणजेच टोकाचा विचार करून स्वतःचे जीवन संपवत आहेत. जीवनात आलेल्या वेगवेगळ्या अपयशांना व दुःखांना घाबरून व निराश होऊन आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या, बेरोजगारांच्या, शेतकऱ्यांच्या आणि विविध कारणांनी जसे की, वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून किंवा वेळेवर नोकरी मिळत नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या माणसांची संख्या प्रचंड वाढली आहे. मला समाज व गावकरी काय म्हणतील? मी एवढे शिकून बसलो आहे परंतु मला एवढे शिकूनही नोकरी नाही म्हणून मला लोक काय म्हणत असतील? मला मुलगी द्यायला कुणी तयार होईल का? तसेच शेतकरी वर्ग दुष्काळाच्या व अतिवृष्टीच्या कचाट्यात सापडल्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा भार व घरातील घरप्रपंचाचा खर्च व मुला बाळांचे शिक्षण आणि मुलींचे लग्न डोळ्यासमोर तरळत असताना त्यांचे काळीज व जिगर पातळ होऊन जात आहे आणि ते या संकटांना घाबरून आत्महत्येला सामोरे जात आहेत. अशा अविचारी व घाबरट लोकांना मला सांगावे वाटते की, बाबांनो हे जीवन लाख मोलाचे आहे, या जगात आपण काहीही खरेदी करू शकतो. परंतु आई-वडिल, गेलेली वेळ आणि अनमोल जीवन हे माणसाला पुन्हा पुन्हा कधीच मिळू शकत नाही. म्हणून मिळालेला जन्म हा आनंदाने व सुखाने कोणते तरी कार्य कर्तृत्व करून जीवनाला अखेरचा निरोप द्यावा. मेल्यानंतरही लोकांनी आपल्या नावाचा जयजयकार व उदोउदो केला पाहिजे एवढेच करा. त्यासाठी स्वतःचे मन खंबीर बनवा आणि काळीज बेडर व निर्भीड बनवून विचार परिपक्व करून येणाऱ्या संकटांना, दुःखांना व अपयशांना मोठ्या धाडसाने सामोरे जाऊन परिस्थितीला लोळवायला शिका. सध्या मराठा समाज आरक्षण मिळत नाही म्हणून मोठमोठे मोर्चे काढत आहे. मराठा समाजाला आता आरक्षणाची नितांत गरज आहे. एकेकाळी गडगंज संपत्तीचा व भरपूर जमिनीचा मालक असणारा मराठा समाज आज एक दोन एकरावर येऊन बसला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट झाल्यामुळे आणि विद्यार्थ्यांना शिक्षणात व नोकरीत आरक्षण नसल्यामुळे विद्यार्थी वेळेवर नोकरीला लागत नाहीत म्हणून बहुतांश शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवत आहेत. खरे तर आत्महत्या करणे हा यावर उपाय नाही हे विद्यार्थ्यांना कोण सांगणार? त्यासाठी अविरत संघर्ष करून व शासनाला न मागता कायदेशीर खेचून आणून आरक्षण मिळवले पाहिजे. आत्महत्या करून जीवन संपवणे हे खरोखरच मला तर योग्य वाटत नाही. हे डरपोक व अविचारी लोकांचे लक्षण आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. माझ्या गावातील माझा मित्र विविध सामाजिक संघटनेत काम करणारा व मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज दादा जरांगे पाटलांसोबत आरक्षण मिळावे म्हणून समाजकार्यात सक्रिय असणारा अभिजीत गोविंदराव सोळंके हा मुलगा कुणबी नोंदी सापडत नाहीत म्हणून स्वतःच्या मुलीचे भवितव्य त्याला भेडसावत होते. अखेर त्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवले आहे, शासनाने याची दखल घेऊन त्याच्या कुटुंबीयांना व मुला बाळांना आर्थिक मदत करावी आणि त्यांना आर्थिक व मानसिक आधार द्यावा..

खरे तर अभिजीत तू चुकलास तू हे करायला नाही पाहिजे होतास, तुज्यासारखा धाडसी व हिंमतबाज माणूस असे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलेल हे मला कधीच वाटले नव्हते...परंतु मराठा समाजाच्या आरक्षणासाठी तू आत्महत्या नाही केलीस तर तू बलिदान दिलास असेच म्हणावे लागेल... सगळ्या विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांना व गरजवंत मराठ्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, बाबांनो स्वतःचे जीवन संपवून घरच्यांना दुःख सागरात लोटू नका, काही दिवस शांत व निशिंत रहा...कोणाचीच परस्थिती कायम एकसारखी राहत नसते. एक दिवस तुमची ही परिस्थिती बदलेल आणि तुमच्याही जीवनात सुखाचे व आनंदाचे क्षण येतील एवढे मात्र नक्की...त्यासाठी जिगरबाज म्हणून आलेल्या संकटाला, अपयशाला व दुःखाला घाबरून न जाता कठोर काळीज करून त्याचा हिंमतीने व धाडसाने सामना करा पण आत्महत्या करण्याच्या भानगडीत पडू नका कारण आत्महत्या करणे हे अविचारी व डरपोक लोकांचे लक्षण आहे हे ओळखा...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# जीवनात कला । अथांग भरली

'कलाहीन जीवन जगणारे लोक पशू असतात,' असं घोर निंदाव्यंजक विधान करणाऱ्या भर्तृहरिला शहाणा म्हणावं की नाही, असा प्रश्न कोणाही सुबुद्ध माणसाला पडेल. अरे संसार संसार, जसा तवा चुल्यावर । आधी हाताला चटके, मग मिळते भाकर ॥ हे सामान्यांच्या जीवनाचे हाल असतील, तर त्यात त्यांचा काय दोष? अशा सामान्यांना जनावरात जमा करणं, ही पांडित्य मिरवणाऱ्यांची घमेंड अशोभनीय ठरते! भर्तृहरिने 'नीतिशतक' लिहिण्याऐवजी 'व्यवहारशतक' लिहिलं असतं, तर त्यांच्यावर निंदापात्र होण्याचा प्रसंग ओढवला नसता. विद्वज्जड, प्रकांड पोकळ बुद्धिवादी आपल्या आजूबाजूच्या समाजजीवनाकडे तुसडेपणाने पाहून जगतात, हेच येथे स्पष्ट होतं. संपलाच नाही भाकरीचा मार्ग। ग्रंथातले स्वर्ग कशापायी॥ असा जीवनवादी कवी नारायण सुर्वे त्यांना भेटलेला नसतो. मराठी साहित्यात आपल्या अभंग रचनेने सामान्यातील सामान्य माणसाच्या मनात ज्यांनी अढळपद प्राप्त केलं, त्या जगद्गुरू तुकोबारायांपासून आणि त्यांच्याही पूर्वी होऊन गेलेल्या संत ज्ञानदेव, नामदेव, चोखोबा आदि संतांना आपण आज कवी मानतो. पण त्यांना कवी न मानणारे महाभाग आजही पांडित्याचा किल्ला लढवीत आहेत. अभंग म्हणजे कविता नव्हे अशी विधानं डॉ. केतकरापासून 'कवितारती'च्या प्रा. पुरुषोत्तम पाटलांपर्यंत सर्वांनी समाजाला धीटपणे ऐकवावीत, ह्यालाच म्हणतात साहित्यिक उन्माद !

तात्पर्य, भर्तृहरीच्या मतानुसार, फार थोडी माणसंच कलाकार असतात, हे निरीक्षणच अयोग्य आहे. खरं तर, सारं जग कलावंतांनीच भरलेलं असून जगात कलाहीन मनुष्य शोधून काढणं मात्र अवघड आहे. उदाहरणार्थ, जगातील सर्व माता ह्या सर्वोच्च कलावंत असतात. नवजात अर्भकाचं कार्यक्षम व्यक्तीत रूपांतर करणं, ही अद्भुत कला आहे. आईइतका विविध कलागुणसंपन्न कलाकार जगात दुसरा शोधूनही सापडणार नाही. आई बाळाला केवळ शरीर देत नाही; तर ते सुडौल, सुंदर, कार्यक्षम, स्वतंत्र, स्वयंपूर्ण कसं होईल, हेही पाहाते. त्याच्यात भाषेची बीजं पेरते, सवयींना आकार देते, त्याची मनोरचना जीवनानुकूल बनवते. कवी यशवंत म्हणतात, 'आई, तुझ्याच ठायी, सामर्थ्य नंदिनीचे। माहेर मंगलाचे, अद्वैत तापसांचे ॥ गांभीर्य सागराचे, औदार्य या धरेचे ॥ वास्तव्य या गुणांचे, आई, तुझ्यात साचे।' अशा आईला साने गुरुजी आई कल्पतरू म्हणतात. आई नावाचा हा कलावंत प्रत्येकाला लाभत असताना दुसरीकडे कलावंत शोधण्याची गरज काय?

जगाचं भरणपोषण करणारा शेतकरी हादेखील थोर कलावंतच ! शेले हा कवी म्हणतो, 'Farmer is the greatest artist, अर्थात शेतकरी हा थोर कलाकारच असतो. तो काळी जमीन हिरवाईने भरून टाकतो. त्याचे मळे, फुलझाडं-फळझाडं, ह्या उत्तम कलाकृती नव्हेत? सुखासीन, ऐतखाऊ संस्कृतपंडित आणि नीतिशतककार भर्तृहरि कधी ह्या कलाकृतीने उल्हसित झालेच नाहीत, तर त्यांना शेतकऱ्यांच्या कार्याचं श्रेष्ठत्व कळणार कसं? कार्लाइल ह्या तत्त्वज्ञानी विचारवंताला मात्र शेतकऱ्याचं श्रेष्ठत्व कळलं होतं. म्हणून तो म्हणतो, 'Two men I honour and no third,' देहाला अन्न देणारा शेतकरी आणि मनाला खाद्य पुरवणारे विचारवंत, या दोनच व्यक्ती त्यांच्या मते सर्वश्रेष्ठ आहेत.

समाजातील मातृवर्ग आणि कृषकवर्ग हे तर कलावंत आहेतच. पण राहिलेला अफाट बहुजन समाज कलावंत नाही, असं कोण म्हणेल? 'बहुजन समाज! केवढा अनंत व अपार कलेचा विषय! किती विविध, किती रसमय! परंतु आपणाला तो पाहायला डोळेही नाहीत आणि ऐकायला कानही नाहीत.' असं तक्रारीच्या सुरात साने गुरुजी बोलतात. त्यांच्या बोलण्याचा ध्वन्यर्थ हाच की, जग कलावंतांनी भरलेलंच आहे; पण त्यांच्याकडे पाहाण्याची आपली दृष्टी मेलेली आहे.

कलेसाठी कला असा कलानिर्मितीच्या क्षेत्रात एक अतिरेकी संप्रदाय प्रा.ना.सी. फडके यांनी रूढ केला. या संप्रदायात बरेच स्वनामधन्य साहित्यिक समाजाकडून प्रतिष्ठा आणि पुरस्कार प्राप्त करून राहिले. पण यांनी समाजाला साहित्य दिलं, ते दुर्बोधही होतं आणि विकृतही होतं. 'कवी थोडे कवडे फार' अशी त्यांची दुर्बोध कविता समाजाने सहन केली, पण केशवसुत मात्र त्यांच्यावर 'कठीण शब्द या धोंड्यांनी करतो हाणाहाण' असा प्रहार करतात. वि.द. घाटे हे विचारवंत म्हणतात, 'साहित्य सकस व्हायचं असेल तर ते लोकांच्या जीवनातून जन्मास आलं पाहिजे, वाढलं पाहिजे, उंचावलं पाहिजे.' आणि शहाण्या लोकांनी प्रत्येक व्यक्तीमधील कलावंत शोधण्याचा प्रयत्न आजन्म केला पाहिजे. 'बहुरत्नानी वसुंधरा' हे खोटं नाही. म्हणून लक्षात घ्या-

साहित्य, संगीत । चित्र, मूर्ती, शिल्प
कला नसे अल्प। जगामध्ये ॥ १
जीवनात कला। अथांग भरली
ओळख न झाली। तिची आम्हां ॥ २
बारा बलुत्यांच्या हाती सुद्धा कला
पाहावया डोळा। हवा आहे ॥ ३
शेतकरी असे। थोर कलावंत
करी काळे शेत । हिरवेगार ॥४
माता बघा असे। कलेचीच माता
अपूर्णा पूर्णता। अर्पितसे ॥५
कला हवी आहे। कळे जी सहज
कलावंता माज। चढू नये ॥६
दुर्बोध कविता। लिहिणारा कवी
त्याची कीर्ती गावी । घुबडांनी ॥७
जन्मे हृदयात। ठसे हृदयात
तेच खरे गीत। अन्य नव्हे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# अतिवृष्टी झालेल्या...

लवकर करून शेतकऱ्यांना शासनाकडून लवकर मदत मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले.

सोलापूर शहरात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत. तसेच शहरात अतिवृष्टीमुळे अनेक भागातील नागरिकांच्या घरात पाणी जाऊन जे नुकसान झाले अशी परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही या दृष्टीने सर्व कारणांचा सविस्तर शोध घ्यावा व त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना सुचवाव्यात असेही निर्देश पालकमंत्री गोरे यांनी महापालिका यंत्रणेला दिले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अतिवृष्टीने व पुरामुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेल्या पंचनामेच माहिती दिली. तसेच सर्व स्थानिक प्रशासकीय यंत्रणेला वेगाने पंचनामे करून त्वरित अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले असल्याची माहिती दिली. महापालिका आयुक्त ओंबासे यांनी शहरात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे करण्याची कार्यवाही पूर्ण होत आल्याचे सांगून या अनुषंगाने कायमस्वरूपी उपाययोजनाबाबतही सविस्तर प्रस्ताव लवकरच दिला जाईल, असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अतिवृष्टीने झालेल्या रस्ते, शासकीय इमारती, शाळा इमारत याबाबतचे पंचनामे करून अहवाल लवकरच सादर केला जाईल असे सांगितले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी पाटील यांनी माहे जून ते आज रोजी पर्यंत वार्षिक सरासरीच्या 95.95 टक्के पाऊस झाल्याची माहिती दिली. तसेच एक ते 18 सप्टेंबर 2025 या कालावधीत 91 महसुली मंडळापैकी 43 महसुली मंडळात 65 मिलिमीटर पेक्षा अधिक म्हणजेच अतिवृष्टी झाल्याचे सांगून 448 गावे बाधित झाल्याचे त्यांनी सांगितले. या कालावधीत करमाळा तालुक्यातील श्रीमती शांताबाई वाघ या मयत झालेल्या होत्या, त्यांच्या नातेवाईक यांच्या थेट बँक खात्यात शासकीय मदत जमा केल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच यामध्ये मयत जनावरे 28, मयत कोंबड्या 15 हजार 25 तर 276 घरांची परझड तर मिळालेल्या प्राथमिक अहवालानुसार बाधित शेतकऱ्यांची संख्या 1 लाख 86 हजार इतकी असून अतिवृष्टी व पुरामुळे 3 हजार 434 नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने नुकसान झाल्याची माहिती पाटील यांनी यावेळी दिली.

यावेळी महसूल चे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# रुग्णसेवेचा विचार करून डॉक्टरांनी संप मागे घ्यावा

## वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे आवाहन

**मुंबई,(कटूसत्य वृत्त):-** रुग्णसेवेवर होणाऱ्या परिणामांचा विचार करून राज्यातील डॉक्टरांनी संप मागे घेण्याचे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले आहे. रुग्णहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची वैद्यकीय संघटनेची परंपरा पुढे चालू ठेवावी, अशी अपेक्षाही वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी व्यक्त केली आहे.



इंडियन मेडिकल असोसिएशन यांना आवाहन करताना मंत्री मुश्रीफ यांनी म्हटले आहे की, विधी व न्याय विभाग व महाधिवक्ता यांच्या अभिप्रायास अनुसरुन, आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम (CCMP) उत्तीर्ण करणाऱ्या राज्यातील नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील अनुसूचीच्या नोंद २८ करिता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने स्वतंत्र नोंदणी पुस्तक ठेवून दि. २५.०६.२०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये केलेल्या सुधारणेची अंमलबजावणी, रिट याचिका क्र.७८४६,७८४७/२०१४ मधील दि.१४.०३.२०१६ चे अंतरिम आदेश व याचिकेच्या अंतिम निर्णयांच्या अधीन राहून करण्याबाबत दि.०५.०९.२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेस निर्देश देण्यात आले आहेत. ही बाब न्यायप्रविष्ट असल्याने याबाबत उच्च न्यायालय जो अंतिम निर्णय देईल त्याप्रमाणे राज्य शासन पुढील कार्यवाही करेल. यावास्तव राज्यातील सर्व आरोग्य सेवा सुरळीत चालु राहण्यासाठी पुकारलेला संप मागे घेण्यात यावा, असे आवाहन मंत्री मुश्रीफ यांनी केले आहे.

# मतदान चोरी संघटित कटाचा भाग...

त्यांनी या प्रकरणात अनेकांची बाजूही मांडली. पहिल्या प्रकरणात गोदाबाई नावाच्या महिलेचा समावेश होता, जिच्या नावाने १२ लोकांची नावे काढून टाकण्यात आली होती, जरी गोदाबाईंना याची माहिती नव्हती. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, हे कोणाच्या संगनमताने घडले. दुसऱ्या प्रकरणात सूर्यकांत नावाच्या एका पुरुषाचा समावेश होता, ज्याच्या नावाने फक्त १४ मिनिटांत १२ मतदारांची नावे काढून टाकण्यात आली, पण जेव्हा त्यांना विचारणा करण्यात आली तेव्हा त्यांनी याविषयी कोणतीही माहिती नसल्याचे स्पष्टपणे नाकारले. तिसऱ्या प्रकरणात नागराजचा समावेश होता, या उदाहरणावरून असे दिसून येते की संपूर्ण यंत्रणा सॉफ्टवेअरद्वारे चालवली जात आहे.

विरोधी पक्षनेते म्हणाले की, सॉफ्टवेअर मतदार यादीतून काढून टाकण्यात येणाऱ्या पहिल्या नावांना लक्ष्य करत आहे. काँग्रेसची मजबूत स्थिती असलेल्या १० बूथमध्ये मोठ्या प्रमाणात वगळण्यात आले. २०१८ च्या निवडणुकीत काँग्रेसने या १० बूथपैकी ८ जिंकले होते, पण यावेळी ६,००० मतदारांची नावे काढून टाकण्यात आली. हे सर्व काँग्रेस समर्थक मतदारांना लक्ष्य करून एका संघटित कटाचा भाग आहे.

त्यांनी विचारले की, वेगवेगळ्या राज्यांमधील मतदार यादींमध्ये केंद्रीय फेरफार करणारा 'तिसरा माणूस' कोण आहे. हीच प्रक्रिया उत्तर प्रदेश, हरियाणा, बिहार आणि महाराष्ट्रात अवलंबण्यात आली आहे. हे केवळ आंध्र प्रदेशपुरते मर्यादित नाही. विविध मतदारसंघांमधील काँग्रेस मतदारांना लक्ष्य करून मतदार यादीतून नावे पद्धतशीरपणे वगळण्यात आली आहेत.

राहुल गांधी म्हणाले की, आयोग झोपलेला असल्याचा दावा करू शकत नाही. सत्य हे आहे की, आयोगाला सर्व काही माहित आहे आणि तो या मतदान चोरीला मदत करत आहे. राहुल म्हणाले की, हा लोकशाहीवर थेट हल्ला आहे आणि काँग्रेस या मुद्द्यावर गप्प बसणार नाही. त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे आणखी पुरावे आहेत, जे ते भविष्यात देशासमोर सादर करतील. राहुल म्हणाले की 'हायड्रोजन बॉम्ब' चे पुरावे लवकरच समोर येतील आणि आजचा खुलासा हा त्या मालिकेचा एक भाग आहे. त्यांनी जरी स्पष्ट केले असले की, हा हायड्रोजन बॉम्ब नाही, पण खरे स्फोटक पुरावे अजून येणे बाकी आहेत.

## बहूजन समाजाची कार्टी धिंगाणा, मस्ती अन पार्टी

महापुरुषांच्या जयंतीस ज्यांना
अभिवादनासाठी वेळ नसतो
ईतर दिवशी सणोत्सवाच्या
निमीत्ताने बँडसमोर लोळत बसतो

जातीयतेचं बीज कुणीतरी धर्माच्या
नावाखाली नुसतं पेरुन बघावं
अन उच्चशिक्षीत बहूजनांनसुध्दा
जातीय दंगलीत पेटून उठावं

चिकित्सा, वाचन अन विचार
तर आमच्या पाठ्यपुस्तकातच नाही
शिव-फुले-शाहू-आंबेडकरांसारखे
महापुरुष मस्तकातच येत नाहीत

वेळीच सावरलो आम्ही तर निदान
दाभोळकर-पानसरेंना जिवंत ठेवू
अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर होऊन
आईवडिलांच्या स्वप्नांना पुर्णत्वास नेउ

**शिवश्री सचिन जगताप**
९६९६९६९५५८
९८९००४७५५८

## वात्रटिका

### धाक उरलेला नाही

आधी नेते झाले आता
पुतळ्यावर वेळ आली...
कोण्या माथेफिरूने
पुतळ्यावर शाईफेक केली...
विकृतीच्या मनोवृत्तीला
कोणी विकृतच पोसतो...
धाडस तेंव्हाच होते जेव्हा
कायदा झोप घेत असतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राज्य सेवा स्पर्धा परिक्षेत प्रथम आलेल्या अमृता ननवरे हिचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य सेवा स्पर्धा परिक्षेत मुलींमध्ये राज्यात मुलींमध्ये प्रथम येण्याचा बहुमान कु. अमृता बाबुराव ननवरे हिने मिळवला. या निमित्ताने प्रा. संजय जाधव, मुळेगांवचे उपसरपंच शिवराज जाधव यांच्यासह अन्य मान्यवरांनी परिवारीक वातावरणात कु. अमृताचा सत्कार करून तिच्या भावी वाटचालीसाठी अभिष्टचिंतन केले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे हिरज येथील कु. अमृता बाबुराव ननवरे हिने सेल्फ स्टडी करीत घेतलेल्या कठोर परिश्रमाने ग्रामीण भागातूनही यश संपादन करू शकतात, हे दाखवून दिले आहे.

याप्रसंगी जाणता राजा बहु. शिक्षण प्रसारक मंडळचे संस्थापक गणेश निळ, न्यु इंग्लीश स्कुल, दोड्डीचे मुख्याध्यापक गंगाधर डोके, मुळेगांवचे सामाजिक कार्यकर्ते भगवान ताकमोगे, आडत व्यापारी सचिन शिंदे, ब्रह्मा म्हेत्रे, खांडेकर सर, सुरवसे सर यांच्या उपस्थितीत कु. अमृताचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

खडतर परिश्रमाशिवाय यश मिळत नाही. ग्रामिण भागातील विद्यार्थीही कठोर परिश्रमाने अभ्यास करुन स्पर्धा परिक्षेत यशस्वी होऊ शकतात. त्यासाठी जिद्द अन चिकाटीही हवी आहे, असे मत सत्काराला उत्तर देताना कु. अमृताने म्हटले.



### एसईबीसी चा लाभासाठी जरांगे-पाटील यांचंही आभार : कु. अमृता नन्नवरे

या यशात त्यांचं कुटुंबीय वडील-आई, बहिण, भाऊ यांचंही योगदान आहे, एसईबीसी च्या दहा टक्के आरक्षणाचा झालेला फायदा याबद्दल मराठा आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचं ही आभार मानायला कु. अमृता विसरली नाही. राज्य सेवा स्पर्धा परिक्षेत प्रथम आलेल्या अमृता ननवरे हिचा सत्कार

# ११८ ग्रामपंचायतींमध्ये एकाच वेळी सभा ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग



**अक्कलकोट (कटुसत्य वृत्त):** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठीची भव्य योजना आहे. या अभियानात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाल्यास शिरवळसह अक्कलकोट तालुक्यातील प्रत्येक गाव सुशासनाचे आदर्श मॉडेल ठरेल, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी बुधवारी केले.

शिरवळ ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ व ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी ऑनलाइन संवाद साधून ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले की, या अभियानातून गावोगावी विकासाची चळवळ उभी राहील. पारदर्शक प्रशासन व सुशासन प्रस्थापित करणे हा यामागचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, माजी जि. प. सदस्य आनंद तानवडे, सरपंच आशादेवी बिराजदार, उपसरपंच पूजा कवडे, ग्रामविकास अधिकारी अभय नेलुरे, आप्पासाहेब बिराजदार, बसवराज तानवडे, आप्पू देवकर, राजू जवळगे, संगप्पा चानकोटे, अजित व्हदलुरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यातील तब्बल ११८ ग्रामपंचायतींमध्ये एकाच वेळी सभा घेण्यात आल्या.

प्रत्येक ठिकाणी स्क्रीनद्वारे मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांचा ऑनलाइन संवाद दाखवण्यात आला. दहिटणे येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी सरपंच नितीन मोरे, विकी चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामविकास विभाग शाश्वत विकासासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार, सेंद्रिय शेती, महिला बचत गट, आवास योजना, दुग्धोत्पादन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन अशा विविध योजनांचा प्रभावी अंमल करणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# मोहोळमध्ये खड्डयांचा त्रास

## शिवसेनेचे 'खड्डयात बसून' आंदोलन



**पोखरापूर, (कटूसत्य वृत्त):** मोहोळ येथील मेन रोडवरील मोठ्या खड्डयांमुळे नागरिकांना मोठा त्रास होत आहे. मुख्य रस्त्यावर पडलेले खड्डे नागरिकांच्या वर्दळीला अडथळा आणत असून, यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. यावर लक्ष वेधून घेण्यासाठी शिवसेना (उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट) यांच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी मेन रोडवरील खड्डयात बसून आंदोलन केले.

मोहोळ शहर हे तालुक्याचे ठिकाण असून, इथून ग्रामीण भागातील नागरिक व विद्यार्थ्यांची नियमित वर्दळ असते. शहराची लोकसंख्या ४० ते ४५ हजार असून, मुख्य रस्त्यावर मोठी बाजारपेठ असल्यामुळे तेथे नेहमीच गर्दी असते. पावसाळ्याच्या दिवसांत रस्त्यांतील खड्डयात पाणी साचल्यामुळे ते खड्डे दिसत नाहीत, आणि त्यामुळे नागरिक तेथे पडून जखमी होण्याचे प्रकार वाढले आहेत.

शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी यावर प्रशासनाचे लक्ष वेधून घेत, तात्काळ रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मागणी केली. मंगेश पांढरे, अजय कुर्डे, विक्रमसिंह शिंदे, राजू गुंड, आबासाहेब कांबळे, राहुल तावस्कर, मुक्ता खंदारे, जितेंद्र अष्टूळ आणि इतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी खड्डयात बसून आंदोलन केल्याने प्रशासनावर दबाव निर्माण झाला आहे.

नगरपरिषद प्रशासनाने शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले असून, यासाठी पुढील चार दिवसांत डांबराने खड्डे बुजवण्याचा निर्धार केला आहे. तरीही, पावसाळ्याच्या स्थितीला पाहता कार्यवाही जलद गतीने होईल का यावर नागरिकांचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

**नागरिकांची मागणी:**

मेन रोडवरील खड्डयांमुळे होणाऱ्या अपघातांबद्दल नागरिकांनी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, यापूर्वी देखील खड्डयांवरील तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**शिवसेनेची भूमिका**

शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत प्रशासनाला तीव्र संदेश दिला आहे. "खड्डयांचे त्वरित बुजनं आवश्यक आहे, अन्यथा नागरिकांचा त्रास वाढणार आहे," असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

मोहोळमधील खड्डयांच्या समस्येवर प्रशासनाने लक्ष घालून काम सुरू केले आहे, परंतु नागरिकांची धडपड आणि शिवसेनेचे आंदोलन हे प्रशासनाला तातडीने निर्णय घेण्यास भाग पाडत आहेत

# बेकायदा बांधकाम पाडण्यासाठी २४ तासांची मुदत : आयुक्तांचा इशारा



**सोलापूर (कटुसत्य वृत्त) :** नैसर्गिक नाले अडवून करण्यात आलेली बेकायदा बांधकामे तातडीने हटवावीत, अन्यथा महापालिकेकडून थेट पाडकामाची कारवाई होईल आणि त्याचा खर्च संबंधित मिळकतधारकांकडून वसूल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागांत पाणी साचून नागरिकांचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संयुक्त पथकाने बुधवारी बाधित भागांची पाहणी केली. यामध्ये अक्कलकोट रोडवरील पंजवनी मार्केट, सादूल पेट्रोल पंप, वज्रेश्वरी नगर, मुद्रा सन सिटी, विराट मॉल परिसर तसेच शेळगी नाला परिसर यांचा समावेश होता.

पाहणीत नॅशनल हायवेच्या कामांमुळे नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह अडथळलेला असून पाणी निचऱ्यात अडचण निर्माण झाल्याचे दिसून आले.

यामुळे स्थानिक व्यापारी व नागरिकांना फटका बसल्याचे स्पष्ट झाले.

या पाहणीत आ. विजयकुमार देशमुख, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहायक नगररचना संचालक मनीष भीष्णूरकर, नगर अभियंता सारिका आकुलवार, अभियंता नीलकंठ मठपती, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार चितारी तसेच नॅशनल हायवेचे अधिकारी स्वप्निल कासारे उपस्थित होते.

आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, ज्या ठिकाणी नैसर्गिक नाले अडवून अथवा वळवून अनधिकृत बांधकाम झाले आहे, त्या मिळकतधारकांना त्वरित नोटिसा देऊन २४ तासांची मुदत द्यावी . दिलेल्या मुदतीत कारवाई न झाल्यास महापालिका स्वतः पाडकाम करेल. तसेच पाणी निचऱ्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भुयारी मार्ग करण्याचे नियोजन करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

नागरिकांना दिलासा मिळावा व पूरस्थिती टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यास महापालिका कटिबद्ध असून, कारवाई पुढील काही दिवसांत सुरू होईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

# १ हजार ८८१ भूमिहीनांना जागा : सीईओ जंगम

## प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील कामगिरी

**सोलापूर (कटुसत्य वृत्त) :** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात एक लाखांपेक्षा जास्त घरकुलांची कामे सुरू आहेत. त्यातील भूमिहीन लाभार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आतापर्यंत १,८८१ भूमिहीनांना गावठाण, गायरान, खरेदीखत तसेच मयत वारसा हक्काने जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे , अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

सीईओ जंगम म्हणाले की, जिल्ह्यातील ५,३५५ लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नसल्याने घरकुल बांधकामात अडथळे येत होते. मात्र प्रशासनाने विविध उपाययोजना राबवून त्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे.



काही ठिकाणी घरकुल बांधकाम संथगतीने सुरू असल्याने मोहोळ व उत्तर सोलापूर तालुक्यातील ग्रामसेवकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. येत्या १० ते १५ दिवसांत प्रगती दिसून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, सीईओ जंगम यांनी अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे आणि शिरवळ गावांना भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी ग्रामसभेत उपस्थित राहून नागरिकांना अभियानात सक्रिय सहभागाचे आवाहन केले.

याशिवाय, तेलंगणातील विकासकामांचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील दहा जणांची टीम तेलंगणास भेट देणार आहे. या टीमचे नेतृत्व जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ करणार आहेत.

# इतर मागास प्रवर्गातील थकबाकीदारांसाठी ५०% व्याजमाफी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत इतर मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांसाठी स्वयंरोजगाराच्या विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांतर्गत थकबाकीदार लाभार्थ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी एकरकमी परतावा (One Time Settlement – OTS) योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू करण्यात आली आहे.या योजनेनुसार, ओबीसी महामंडळाकडून घेतलेल्या संपूर्ण थकीत कर्जाची एकरकमी रक्कम भरल्यास संबंधित लाभार्थ्यार्ला थकीत व्याज रकमेवर ५०% सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही. डी. लहारे यांनी केले आहे.

**योजनेचे वैशिष्ट्य:**

- थकीत कर्जाची एकरकमी भरपाई केल्यास व्याजावर ५०% सवलत
- योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू
- स्वयंरोजगारासाठी घेतलेल्या कर्जदारांसाठी विशेष संधी
- कर्जमुक्त होऊन नव्या योजनांचा लाभ घेण्याची संधी

**संपर्क:**

अधिक माहितीसाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा:

जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, सोलापूर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तिसरा मजला, सात रस्ता, सोलापूर - ४१३००३ दूरध्वनी: ०२१७-२३१२५९५.

# बार्शी तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले; चांदनी नदीला महापूर, हजारो हेक्टर शेती पाण्याखाली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून जोरदार पावसाचा तडाखा बसत आहे. यात बार्शी तालुक्याला मोठ्या प्रमाण पाऊस होत असून पुन्हा एकदा तालुक्याला जोरदार पावसाने झोडपून काढले आहे. या पावसामुळे पिंपरी साकेत गावाला जोडणारा पूल ओव्हर फ्लो झाला असून येथील रहदारी बंद झाली आहे. तर तालुक्यातील चांदनी नदीला देखील महापूर आल्याने हजारो हेक्टर शेत जमीन पुराच्या पाण्याखाली गेली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात पुन्हा एकदा जोरदार पावसाचा फटका बसला आहे. यामुळे तालुक्यातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. तर पिंपरी साकेत गावाला जोडणाऱ्या पुलावरून भोगावती नदीचे पाणी वाहत असताना एका दुचाकीस्वाराने पाण्यात गाडी घातली. पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने दुचाकीस्वार वाहून जातं होता, मात्र पिंपरी साकेत गावच्या ग्रामस्थ्यांनी प्रसंगावधान दाखवत पाण्यात वाहून जाणाऱ्या दुचाकीस्वाराचे प्राण वाचवले आहेत.बार्शी तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे उत्तर भागातून



वाहणाऱ्या चांदनी नदीला महापूर आला आहे. यामुळे मांडेगाव, कांदलगाव, देवगावसह ८ गावातील हजारो हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेले आहेत. तसेच कांदलगावात प्राथमिक आरोग्य केंद्रासह नरसिंह मंदिर देखील पाण्याखाली गेले आहे. चांदणी नदीने रौद्र रूप धारण केले असल्याने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान जिल्ह्यातील गेली चार दिवसापासून अक्कलकोट तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. अक्कलकोट मध्ये देखील मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. या पावसामुळे अक्कलकोट - वागदरी रस्ता रहदारीसाठी बंद झाला आहे. अक्कलकोटच्या शिरसी येथील पुलावरून ३ ते ४ फूट पाणी आल्याने रस्ता बंद झाल्याने अक्कलकोट - वागदरी रस्ता बंद असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# 'दिलखुलास' कार्यक्रमात डॉ. संदीपान जगदाळे यांची आज पासून विशेष मुलाखत

**मुंबई(कटूसत्य वृत्त):-** 'शिक्षक हा समाज परिवर्तनाचा खरा शिल्पकार आहे' या विचाराला प्रत्यक्ष कृतीतून उजाळा देणाऱ्या लातूर जिल्ह्यातील दयानंद कला महाविद्यालयाचे शिक्षक प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांना सन 2025 चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. 'शिक्षक म्हणून केलेल्या त्यांच्या उल्लेखनीय कायार्चा गौरव' याविषयावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत शुक्रवार दि. 19, शनिवार दि.20 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 7.25 ते 7.40 या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'न्यूज ऑन एआयआर' मोबाईल ॲपवर प्रसारित होईल. निवेदक विवेक सौताडेकर यांनी ही मुलाखत घेतली आहे.

शिक्षक प्रा. डॉ. जगदाळे यांनी अध्यापनासोबतच संशोधन, साहित्यनिर्मिती आणि समाजसेवा या क्षेत्रांत केलेल्या कायार्मुळे ते विद्यार्थ्यांसोबतच समाजालाही मार्गदर्शन करत आहेत. परिषदांमधील सक्रिय सहभाग, संशोधन लेखन, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी जोपासणे, राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रनिमार्णासाठीचे उपक्रम या सर्व कामगिरीसाठी त्यांना यंदाच्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या समृद्ध प्रवासाबद्दल प्रा. जगदाळे यांनी 'दिलखुलास' या कार्यक्रमात संवाद साधला आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राष्ट्रवादीचे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते २) महाराष्ट्रातील एक जिल्हा, या जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहते ३) माकड ४) स्वभावाने रागीट ५) क्रिकेटमधील फलंदाजाच्या हातातील लाकडी फळी (इंग्रजीत) ६) मिरच्या व गरम मसाला वापरून बनविलेले तिखट ९) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुटर घुं करणारा पक्षी १३) आर्थिक व्यवहारात केलेला घोटाळा १५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) १७) उत्तरप्रदेश संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** १९) घर (हिंदीत) २०) तिखट न टाकता डाळीचे बनविलेले कालवण २१) मनसे अध्यक्ष-** ठाकरे २३) फसवणूक करणारा २५) झुणका बनविण्यासाठी केलेले डाळीचे पीठ-*** पीठ २७) आवकच्या विरूध्दार्थी २८) रोख ३०) स्वत:वरील विश्वास, सचिन पिळगावकरचा एक चित्रपट ३२) दैत्य, राक्षस ३४) पुष्कळ, भरपूर ३५) धातूचा बारीक तंतू ३६) अध्ययन, रिडिंग (मराठीत) ३७) लिंबूपाण्याचे पेय ३३) सूर्य ३९) गंध, परीमळ ४१) मुंबईतील प्रमुख रेल्वे स्टेशन ४३) एक दुग्ध पेय ४५) सहा गुणिले दोन

**आडवे शब्द :** १) यात्रेनिमित्त देवाची वाजतगाजत काढलेली मिरवणूक ३) पश्चिम बंगालच्या महिला मुख्यमंत्री ७) खा. अमोल कोल्हे यांचा लोकसभा मतदारसंघ ८) वर्गातील मुलांची एकूण संख्या ९) बोल्टचा जोडीदार, अभिनेता १०) जवळ, समीप ११) कपडे वा मौल्यवान वस्तू ठेवण्याची मोठी पेटी १३) पायात चप्पल न घालता चालणे १४) हॉटेलमधील नोकर १५) खडबडीत (इंग्रजीत) १६) सीताहरण प्रसंगी रावणाशी लढा देणारा मोठा पक्षी १८) एक सद्गुरू-***** पै २२) धान्याचे केलेले बारीक चूर्ण २४) पटाईत, पारंगत २६) शिवसेनेचे मुंबईतील एक नेते-**** किर्तीकर २९) कोकणात आढळणारे वरून काटेरी पण आत गोड गरे असणारे मोठे फळ ३०) चार दुणे ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३२) दरवाजा ३३) फायदा, लाभ ३५) शक्तीमान, ताकद असलेला ३८) शासकीय कार्यालयीन सुट्टीचा वार ४०) स्वादिष्ट, रूचकर ४२) एकमेकाबद्दल असलेली खात्री, हमी ४३) एक म्हण-*** तोंडी मोठा घास ४४) शब्दाला असलेले वजन, दरारा ४६) दोरी ४७) श्रीरामाचा एक बंधू, कैकयी पुत्र

## सुडोकु - 58

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | | | 4 | 2 | |
| | 5 | | | | 9 | 6 | | |
| 6 | 8 | 7 | | | | | 1 | 5 |
| | | 9 | 6 | 5 | 8 | 1 | 3 | 2 |
| | | 2 | | 4 | | | | 8 |
| | | | | 9 | 1 | | 6 | 4 |
| 3 | | | | | 2 | | | |
| 7 | 2 | | | 1 | | 3 | 4 | 9 |
| 8 | 9 | 1 | | | 7 | | 5 | |

